अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा
संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्तः प्रणश्यति ।।
अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# कराची विमानतळावरचा हल्ला मोठ्या कटाचा भाग

कराची विमानतळावर झालेला हल्ला हा एका मोठ्या कटाचा भाग म्हणावा लागेल. प्रामुख्याने नवाझ शरीफ यांनी पाकिस्तानचे अध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर दहशतवादी पुन्हा कार्यरत झाले होते. त्यात त्यांनी नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीला हजेरी लावल्यानंतर दहशतवाद्यांनी त्यांना खुले आव्हान दिले होते. पाकिस्तानला मुळातच दहशतवादाचा गंभीर धोका असताना त्याठिकाणी मुक्काम ठोकून असलेले जिहादी गट त्यांना सहजासहजी काम करू देणार नाहीत. यापूर्वीच्या सरकारलाही या दहशतवाद्यांनी काम करू दिले नाही. कराची विमानतळावर हल्ला झाल्यानंतर तिथल्या लोकांना मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याची आठवण व्हावी, यावरून त्याची गंभीरता लक्षात येते. दहा दहशतवाद्यांनी जुन्या टर्मिनसवरून प्रवेश केला आणि अंदाधुंद गोळीबार करून चोवीसजणांचे बळी घेतले. मुंबईवर हल्ला करणारे दहाच दहशतवादी होते. आपली दहशत माजवून नवाझ शरीफ सरकारवर दडपण आणण्याचा हेतू दिसून येतो. प्रामुख्याने हे सगळे दहशतवादी तालिबानी गटाचे असावेत. कारण नवाझ शरीफ ज्यावेळेला भारतभेटीवर आले होते. त्यावेळी तालिबानी दहशतवाद्यांनी भारत आणि नवाझ शरीफ यांच्या विरोधात बांग दिली होती. पाकिस्तानातील हिजबूल मुजाहिदीन या दहशतवादी संघटनेने थेट बदला घेण्याची भाषा बोलून दाखवली होती. पाकिस्तानातले कोणत्याच जिहादी गटाला भारताबरोबर तिथल्या राज्यकर्त्यांचे संबंध सुरळीत व्हावेत असे वाटत नाही. कारण केवळ धर्मांधतेच्या जोरावर त्यांना आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे. कारण आता बदलत्या परिस्थितीमध्ये पाकिस्तानातही त्यांची मुळे उखडली जाण्याची शक्यता दिसते. विशेषतः नवाझ शरीफ पंतप्रधान झाल्यानंतर आणि त्यांनी भारताबरोबर चांगले संबंध निर्माण करण्याची अपेक्षा व्यक्त केल्यानंतर पाकिस्तानातल्या सगळ्याच दहशतवाद्यांचे पित्त खवळले आहे. या हल्ल्यामध्ये दहाही दहशतवाद्यांना ठार करण्यात पोलिसांना यश आले ही त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट ठरते. यापुढे पाकिस्तान किंवा भारत या दोघांनाही जर दहशतवाद रोखायचा असेल तर तो अशाच कठोरतेने चिरडून काढावा लागेल. याबाबत कोणतीही दयामाया न दाखवता किंवा त्याचा धार्मिक भावनांसाठी उपयोग न करता केवळ हिंसाचार पसरवणाऱ्यांना रोखण्याचे कर्तव्य बजवावे लागेल.

### दहशतवादी पुन्हा कार्यरत

येणाऱ्या काळामध्ये दहशतवाद हा भारत, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या तीनही देशांच्या दृष्टीने महत्त्वाचा मुद्दा असेल. नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीला अफगाणिस्तानचे अध्यक्ष करजाई हेसुध्दा उपस्थित होते. त्यांनीदेखील आपल्या मुलाखतीमध्ये अफगाणिस्तानातल्या दहशतवादाला पाकिस्तानातले जिहादी गट खतपाणी घालत असल्याचा आरोप केला होता. अफगाणिस्तानातून पळवून लावलेल्या अनेक दहशतवाद्यांनी पाकिस्तानात आश्रय घेतला असल्याचे त्यांनी म्हटले होते. यावरून भारतातल्या दहशतवादी कारवाया पाकिस्तानातल्या जिहादी गटांकडून चालवल्या जातात. अफगाणिस्तानलाही तोच त्रास सहन करावा लागतो. या दोन्ही देशांची पाकिस्तानविरुध्द जर सामूहिक तक्रार असेल तर या संकटाचा निपटारा करण्याकरिता भारत, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे तीनही देश एकत्र येऊन लढा देऊ शकतात. त्यासाठी विशेष मोहीम राबवू शकतात. या तीनही राष्ट्रप्रमुखांनी जर या दहशतवादाविरुध्द संघटितपणे आणि नियोजनपूर्वक प्रयत्न केले तर त्यांना निश्चितच यश मिळू शकेल. मात्र याकरिता तिघांनी तितकीच राजकीय इच्छाशक्ती दाखवली पाहिजे. कदाचित भारत, पाकिस्तान या दोन देशांमधला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणून नरेंद्र मोदी यांनी याबाबत लक्ष घातले आणि संयुक्तपणे दहशतवादाविरुध्द लढण्याचे ठरवले. तर आज पाकिस्तानामध्ये धुमाकूळ घालणाऱ्या या दहशतवाद्यांना कायमचा धडा शिकवला जाऊ शकतो. नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान होणे ही गोष्टसुध्दा तिथल्या दहशतवाद्यांना मानवली नाही. ते नवाझ शरीफ यांच्याबरोबरच नरेंद्र मोदी यांच्यासमोरही सतत हा धोका निर्माण करीत राहतील. भारताला तर दहशतवाद मोडून काढायचा असेल तर तो पाकिस्तानच्या मदतीनेच मोडून काढावा लागेल. अन्यथा त्याला पूर्ण यश येणार नाही. बदलत्या परिस्थितीत पाकिस्तानशी थेट युध्द छेडणे भारताला परवडणारही नाही. अशावेळी अमेरिकेप्रमाणेच तिथल्या राज्यकर्त्यांना हाताशी धरून जर दहशतवाद्यांची मुख्य केंद्रे उध्वस्त करता आली तर ते जास्त फायद्याचे ठरू शकेल. मात्र तिथल्या राज्यकर्त्यांनीच जर योग्य ते सहकार्य केले नाही तर भारताला अधिक कठोर भूमिका घ्यावी लागेल. या सगळ्याच परिस्थितीचा अंदाज घेण्याची आताच योग्य ती वेळ आहे. नवाझ शरीफ यांच्या मदतीने निश्चित किंवा ठोस स्वरुपाचे उपाय शोधता येणे शक्य आहे.

### भारतासाठी इशारा

कराची विमानतळावरचा हल्ला हा भारतासाठीसुध्दा इशारा ठरतो. कारण या हल्ल्याच्या निमित्ताने विमानाचे अपहरण करण्याचाही दहशतवाद्यांचा कट होता अशी माहिती पुढे येत आहे. अगदी तशाच स्वरुपाची योजना त्यांनी नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीच्या दिवशी आखल्याची माहिती गुप्तचरांना मिळाली होती. यावरून नवाझ शरीफ आणि नरेंद्र मोदी या दोघांपुढेही सारखेच आव्हान उभे करून दहशतवादी आपला हेतू साध्य करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. कदाचित एकाचवेळी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही ठिकाणी हल्ले होऊ शकतील. दहशतवाद्यांना एकाचवेळी आपला हेतू साध्य करता येईल. म्हणूनच हा हल्ला आपल्यासाठीदेखील आहे असे समजून भारताने अधिक दक्षता पाळली पाहिजे. जागतिक पातळीवर सर्वच देश दहशतवादाविरुध्द उभे राहात आहेत. अमेरिकेने तर याबाबत कोणतीही तडजोड करायची नाही असा निर्णय घेतलेला आहे. त्यादिशेने त्यांची उपाययोजनाही सुरू आहे. सार्क देशांनीसुध्दा दहशतवाद हा महत्त्वाचा मुद्दा ठरवून एकत्रितपणे मोहीम आखायला काहीच हरकत नाही. दोन महिन्यांपूर्वीच एका मलेशियन विमानाला झालेला अपघात हा घातपात असल्याचेच आढळून आले होते. यावरून सार्क देशांपुढेसुध्दा या संकटाचे आव्हान कायम आहे हे स्पष्ट होते. म्हणूनच बदलत्या परिस्थितीत या आव्हानाचा मुकाबला करणे आणि तितक्याच ताकदीने ते परतवून लावणे आवश्यक ठरणार आहे. ही सगळी परिस्थिती भारतासाठी जेवढी चिंताजनक तेवढीच लढण्यासाठी संधी उपलब्ध करून देणारी ठरते.